## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांचेकडून दिनांक ०६/०८/२०१२ रोजी प्राप्त पत्र व त्यासोबत प्राप्त झालेले कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५६/२०१२/जा.५४७, दिनांक ०९/०८/२०१२, ३०/०८/२०१२ व १२/०९/२०१२.

३) नुर औदा लैस मोहम्मद खान व मोहम्मद जलालुद्दीन मोहम्मद आमीन खान यांचे दिनांक २८/०८/२०१२ रोजी नोंदविण्यात आलेले स्वतंत्र लेखी जबाब.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २९/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २९/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५६/२०१२/जा.२८०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १८ / 3 /२०१३.

## आ दे श

### (जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०१/०७/२०१२ रोजी श्री. खैरे वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांना जनादेश वृत्तवाहिनीचे संपादक सुरेश पाटील यांनी फोनद्वारे कळविले कि, मोहनभाई वाडी व्ही.एन.पुरव मार्ग मानखुर्द, सायन-पनवेल हायवेजवळ, आगारवाडी समोर, मुंबई ८८ या ठिकाणी काही इसम गैरकायदेशिररित्या टँकरमधून ऑईल काढत आहेत. त्याबाबत शहानिशा करण्यासाठी श्री. खैरे यांनी सांगितल्याने जयभिम दौलत गायकवाड, पोह २३८४६ हे बीट मार्शल ३ कर्तव्यावरील पोशिक्र. ३३३०१/यादव यांचे सोबत नमूद ठिकाणी २२:०० वाजता गेले असता, त्या ठिकाणी एका अनोळखी मोटार टँकरमधून काही इसम ऑईल काढत असताना दिसले, म्हणून वरील अधिकारी जवळ गेले असता ट्युबलाईटच्या प्रकाशात ते इसम त्यांच्या तोंड ओळखीचे असलेले जलाल ऑईलवाला,

अमित दिपक गोहील, सलीम व नुर असे होते. ते एका अनोळखी मोटार टँकरमधून चालक व क्लिनर यांचे मदतीने ऑईल काढून लोखंडी बॅरलमध्ये भरत होते. अधिकाऱ्यांना पाहून ते अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. त्यावेळी सलीम नावाचा इसम हा त्याचे कारकडे पळू लागला म्हणून अधिकाऱ्यांनी त्यास पळण्याची संधी न देता पकडले व ताब्यात घेतले. त्याला विचारणा करता त्याने त्याचे नाव मो. सलीम मेहबुब शेख असे असल्याचे सांगितले व ऑईल साठवणूकीबाबतचा कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. त्यावेळी मोटार टँकरचा चालक व क्लिनर टँकरसह तेथून जोराने निघून गेले. वरील अधिकाऱ्यांनी सदर बाब वरिष्ठांना सांगितली. त्यानंतर ठाणे अंमलदार पोउनि थोरात यांनी सदर ठिकाणी येऊन सविस्तर घटनास्थळ पंचनामा केला.

अशाप्रकारे वरील अनोळखी मोटार टँकरवरील चालक व क्लिनर यांनी आपसात संगणमत करुन त्यांचे ताब्यात इच्छीत स्थळी पोहचविण्यासाठी सोपविलेल्या मालाचा स्वतःचे फायद्यासाठी अपहार करुन तसेच आरोपीत नामे जलाल ऑईलवाला, अमित दिपक गोहील, सलीम व नुर यांनी आपसात संगणमत करुन स्वतःचे कब्जात ज्वालाग्राही पदार्थ बाळगल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ तसेच २) भा. द. वि. चे कलम २८५, ४०७ व ३४ चा भंग केल्यावरुन ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १२९/२०१२, दिनांक ०२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | प्रत्येकी २०० लिटर मापाचे लोखंडी तेलाचे भरलेले पाच बॅरल व एका २५ लिटर ऑईल भरलेला लोखंडी बॅरल | १०२५ लिटर | १,०२,५००/- |
| २ | बजाज कंपनीची पल्सर मो.सा.क्र.एमएच-०१-केए-२७८६, काळ्या रंगाची, जुनी वापरती | १ नग | १५,०००/- |
| ३ | बजाज कंपनीची ॲव्हेंजर मो.सा.क्र.एमएच-०३-बीएफ-४७९०, काळ्या रंगाची, जुनी वापरती | १ नग | २५,०००/- |
| ४ | हुंडाई कंपनीची आय १०, मोटार कार क्र. एमएच-०४-ईडी-३२५३, लाल रंगाची, जुनी वापरती | १ नग | २,००,०००/- |
| | | एकूण | ३,४२,५००/- |

अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष लोखंडी बॅरलमधील ऑईलचे वेगवेगळे नमुने रासायनिक तपासणीसाठी काढून घेण्यात आले व जागीच सिल करुन नमूद मुद्देमालासह आरोपीस पोलिस ठाण्यात आणण्यात आले.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांनी वाचावे क्रमांक १ अन्वये केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्रमांक २ मध्ये नमूद

केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २८/०८/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस नुर औदा लैस मोहम्मद खान व मोहम्मद जलालुद्दीन मोहम्मद आमीन खान हे उपस्थित राहिले. सदर उपस्थितांचा वाचावे क्र. ३ अन्वये स्वतंत्र लेखी जबाब नोंदविण्यात आले आहेत. तथापी, सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी हे उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी १२/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १२/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. जयवंत रामचंद्र चव्हाण यांनी उपस्थित राहून यापूर्वी टपालामार्फत वाचावे क्र. ४ अन्वये सादर केलेले लेखी अभिवेदन कायम असल्याचे सांगून सदर प्रकरणी बजाज कंपनीची ॲव्हेंजर मो.सा.क्र.एमएच-०३-बीएफ-४७९० ही मा. न्यायालय, ४५ वें न्यायालय, कुर्ला यांनी रुपये ३५,०००/- च्या बंधपत्रावर सोडल्याचे सांगितले. सदर सुनावणीसही उर्वरीत आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक २६/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २६/०९/२०१२ रोजीच्या अंतीम सुनावणीसही उर्वरीत आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत.

सबब, सदर प्रकरणी आरोपी/अपचारी यांना पुरेशी संधी देऊन देखील ते त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीस उपस्थित न राहिल्याने सदरचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

युक्तीवाद :-

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित नुर औदा लैस मोहम्मद खान यांनी दिलेल्या लेखी जबाबात, तो मागील ८-९ वर्षापासून ड्रायव्हरचे काम करीत असून त्याची मुलगी आफरीन खातून हिला मेंदूच्या विकाराकरीता, खान नर्सिंग होम, प्लॉट नं. १४, रुम ९, बैगणवाडी, गोवंडी येथे दिनांक २८/०६/२०१२ ते ०४/०७/२०१२ दरम्यान ॲडमिट केले होते. पोलिसांनी दिनांक ०१/०७/२०१२ रोजी केलेल्या कारवाईच्या दिवशी तो मुलीच्या इलाजाकरीता खान नर्सिंग होममध्ये होता. हॉस्पीटलची बिले त्याच्याकडे असून ती तो पुढील सुनावणीच्या वेळी सादर करीन. सदर गुन्ह्याशी त्याचा काहीही संबंध नसून जलाल ऑईलवाला, अमित दिपक गोहिल, सलीम यांना तो ओळखत नाही. सध्या ड्रायव्हरचे काम मिळत नसल्याने बेकार आहे, असे नमूद केले आहे.

0004

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मोहम्मद जलालुद्दीन मोहम्मद आमीन खान यांनी दिलेल्या लेखी जबाबात, तो गेल्या १५-१६ वर्षापासून मंडाला-मानखूर्द येथे भंगारचा व्यवसाय करीत आहे. रुम नं. ५०२, २३/अ, म्हाडा कॉलनी, न्यु गौतम नगर, गोवंडी, मुंबई या पत्त्यावर तो त्याच्या कुटुंबासह वास्तव्यास असून, त्याचे मुळ गांव श्रीदत्तगंज, गांव बाजिदपूर, जि. गोंडा, राज्य उत्तरप्रदेश असे आहे. दिनांक ०१/०७/२०१२ रोजी ट्रॉम्बे पोलिस ठाण्याच्या पोलिसांनी केलेल्या कारवाईत त्याला जलाल ऑईलवाला या नावाने दोषी पकडून त्याच्यावर कारवाई झाली आहे. प्रत्यक्षात ज्या दिवशी पोलिसांनी कारवाई केली आहे, त्या दिवशी तो मुंबईमध्ये उपस्थित नव्हता. दिनांक २८/०६/२०१२ रोजी तो लोकमान्य टिळक टर्मिनस, कुर्ला येथून सुटणाऱ्या गाडी क्र. २५४२ ने त्याच्या मुळ गांवी गेला होता आणि दिनांक १४/०७/२०१२ रोजी इंडिगो कंपनीच्या विमानाने तो मुंबईत परतला असून दोन्ही प्रवासांची तिकिटे त्याच्याकडे उपलब्ध आहेत. त्यामुळे पोलिसांनी दिनांक ०१/०७/२०१२ रोजी केलेल्या कारवाईच्या वेळी तो मुंबईत हजर नव्हता. सदर प्रकरणातील आरोपी मो. सलीम मेहबुब शेख यास तो पुर्वी ओळखत नव्हता, परंतू सदर प्रकरणात संबंध आल्यानंतर त्याचा त्याचेशी परिचय झाला आहे. त्यामुळे सदर प्रकरणामध्ये त्याचे नांव कसे आले, ते त्याला ठावूक नाही. सदर प्रकरणात त्याचा कसलाही संबंध नाही, असे नमूद केले आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २९/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, नमुद गुन्हयातील आरोपी अमित दिपक गोहिल, नुरल हुदा लैस मोहमद खान, मोहम्मद सलीम मेहबुब शेख व मोहम्मद जलालुद्दीन मोहम्मद अमीन उर्फ जलाल यांना ताब्यात घेऊन त्यांनी दिलेल्या कबुली नंतर त्यांना अटक करण्यात आलेली असुन नमुद आरोपींच्या ताब्यातुन गुन्हयाच्या घटनास्थळावरुन प्रत्येकी २०० लिटर मापाचे ५ लोखंडी तेलाचे भरलेले बॅरल व एक २५ लिटर ऑईल भरलेला बॅरल असे (किंमत अंदाजे रुपये १,०२,५००/-) असे एकूण ६ ऑईलचे बॅरल जप्त करण्यात आले आहे. सदरहू गुन्ह्याचा तपास अद्याप चालू असून गुन्ह्यातील अटक आरोपी यांचे ताब्यातून गुन्ह्याच्या घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेल्या मुद्देमाला संदर्भात आपल्या कार्यालयामार्फत पुढील योग्य ते आदेश होण्यास विंनती आहे, असे नमूद केले आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २९/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या हुंडाई, आय-१० मोटार कार क्र. एमएच-०४-इडी-३२५३ संदर्भात मा. महानगर दंडाधिकारी, ४५ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार सदर मोटार कार ही गाडीचे मालक श्रीमती स्वाती शाहिद अली खान यांचे ताब्यात देण्यात आलेली आहे. न्यायालयाच्या आदेशाची प्रत तसेच इतर कागदपत्रे सोबत जोडली आहे, असे नमूद केले आहे.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, लेखी जबाब, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०१/०७/२०१२ रोजी श्री. खैरे वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांना जनादेश वृत्तवाहिनीचे संपादक सुरेश पाटील यांच्याकडून मिळालेल्या बातमीनुसार, मोहनभाई वाडी व्ही.एन.पुरव मार्ग मानखुर्द, सायन-पनवेल हायवेजवळ, आगारवाडी समोर, मुंबई ८८ या ठिकाणी धाड टाकली असता, जलाल ऑईलवाला, अमित दिपक गोहील, सलीम व नुर हे इसम अनोळखी मोटार टँकरमधून चालक व क्लिनर यांचे मदतीने गैरकायदेशिररित्या टँकरमधून ऑईल काढत असतांना आढळून आले. अधिकाऱ्यांना पाहून ते अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. त्यावेळी सलीम नांवाचा इसम हा त्याचे कारकडे पळू लागला म्हणून अधिकाऱ्यांनी त्यास पळण्याची संधी न देता पकडले व ताब्यात घेतले. त्याला विचारणा करता त्याने त्याचे नाव मो. सलीम मेहबुब शेख असे असल्याचे सांगितले व ऑईल साठवणूकीबाबतचा कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. त्यावेळी मोटार टँकरचा चालक व क्लिनर टँकरसह तेथून जोराने निघून गेले. अशाप्रकारे वरील अनोळखी मोटार टँकरवरील चालक व क्लिनर यांनी आपसात संगणमत करुन त्यांचे ताब्यात इच्छीत स्थळी पोहचविण्यासाठी सोपविलेल्या मालाचा स्वत:चे फायद्यासाठी अपहार करुन तसेच आरोपीत नामे जलाल ऑईलवाला, अमित दिपक गोहील, सलीम व नुर यांनी आपसात संगणमत करुन स्वत:चे कब्जात ज्वालाग्राही पदार्थ बाळगल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन एकूण रुपये ३,४२,५००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित नुरल हुदा लैस मोहमद खान यांनी दिलेल्या लेखी जबाबात, सदर गुन्ह्याशी त्याचा काहीही संबंध नसून जलाल ऑईलवाला, अमित दिपक गोहिल, सलीम यांना तो ओळखत नाही. सध्या ड्रायव्हरचे काम मिळत नसल्याने बेकार आहे, असे नमूद केले आहे. तसेच मोहम्मद जलालुंद्दीन मोहम्मद आमीन खान यांनी दिलेल्या लेखी जबाबात, दिनांक ०१/०७/२०१२ रोजी ट्रॉम्बे पोलिस ठाण्याच्या पोलिसांनी केलेल्या कारवाईत त्याला जलाल ऑईलवाला या नावाने दोषी पकडून त्याच्यावर कारवाई झाली आहे. प्रत्यक्षात ज्या दिवशी पोलिसांनी कारवाई केली आहे, त्या दिवशी तो मुंबईमध्ये उपस्थित नव्हता. सदर प्रकरणातील आरोपी मो. सलीम मेहबुब शेख यास तो पुर्वी ओळखत नव्हता, परंतू सदर प्रकरणात संबंध आल्यानंतर त्यांचा त्याचेशी परिचय झाला आहे. त्यामुळे सदर प्रकरणामध्ये त्याचे नांव कसे आले, ते त्याला ठावूक नाही. सदर प्रकरणात त्याचा कसलाही संबंध नाही, असे नमूद केले आहे.

तथापी, वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांचे टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, नमुद गुन्हयातील आरोपी अमित दिपक गोहिल, नुरल हुदा लैस मोहमद खान, मोहम्मद सलीम मेहबुब शेख व मोहम्मद जलालुद्दीन मोहम्मद अमीन उर्फ जलाल यांना ताब्यात घेऊन त्यांनी दिलेल्या कबुली नंतर त्यांना अटक करण्यात आलेली असुन नमुद आरोपींच्या ताब्यातुन गुन्हयाच्या घटनास्थळावरुन प्रत्येकी २०० लिटर मापाचे ५ लोखंडी तेलाचे भरलेले बॅरल व एक २५ लिटर ऑईल भरलेला बॅरल असे (किंमत अंदाजे रुपये १,०२,५००/-) असे एकूण ६ ऑईलचे बॅरल जप्त करण्यात आले असे नमुद आहे. म्हणजेच नुरल हुदा लैस मोहमद खान व मोहम्मद जलालुद्दीन मोहम्मद आमीन खान यांचा नमुद गुन्हयात प्रत्यक्ष सहभाग असल्याचे सिध्द होत असुन आरोपीतांनी सुनावणीच्या वेळी दिलेला जबाब हा मोघम स्वरुपाचा व या कार्यालयाची दिशाभुल करणारा आहे.

उपरोक्त गुन्हा नोंद प्रकरणी जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीसाठी ठेवण्यात आलेल्या सुनावणीस सर्व संबंधितांना पाचारण करण्यात आले. तथापी, नुरल हुदा लैस मोहमद खान व मोहम्मद जलालुद्दीन मोहम्मद आमीन खान या आरोपींव्यतिरीक्त उर्वरीत आरोपी/अपचारी यांना पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. अथवा जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कोणीही दावा केला नाही. यावरुन प्रस्तुत प्रकरणी जप्त साठ्यासंदर्भात आरोपीतांना काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येत असल्याने सदर प्रकरणी आरोपीतांनी आपआपसात संगनमत करुन घटनास्थळी मोटर टॅंकरमधुन गैरमार्गाने काढण्यात आलेले पेट्रोलियम द्रवपदार्थाची विनापरवाना व बेकायदेशीररित्या खरेदी, साठवणूक व विक्री केली असल्याचे निष्पन्न होत असल्याने सदर पेट्रोलियम द्रवपदार्थाचा संपुर्ण अवैध साठा हा पृथ:करण अहवालाच्या अधिन राहुन शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी, पोलिस पथकाने घटनास्थळी जप्त केलेल्या एकुण ३ वाहनांपैकी एक बजाज कंपनीची काळ्या रंगाची जुनी वापरती ॲव्हेंजर मो.सा.क्र.एमएच-०३-बीएफ-४७९० हे वाहन मा. महानगर दंडाधिकारी, ४५ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई यांनी अर्ज क्र. सीसी. नं.-१२८/२०१२ अन्वये दिनांक ०६/०९/२०१२ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार सदरचे वाहन अर्जदार निलेश डी. गोहिल यांना रुपये ३५,०००/- किंमतीचे बंधपत्र घेऊन मुक्त केले आहे. तसेच एक लाल रंगाची जुनी वापरती हुंडाई कंपनीची आय १० मोटार कार क्र. एमएच-०४-ईडी-३२५३ हे वाहन मा. महानगर दंडाधिकारी, ४५ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई यांनी अर्ज क्र. सीसी. नं.-१३६/२०१२ अन्वये दिनांक २२/११/२०१२ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार सदरचे वाहन अर्जदार स्वाती शाहिदअली खान यांना रुपये ३,५०,०००/- किंमतीचे बंधपत्र घेऊन मुक्त केले असल्याने मा. न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशाबाबत भाष्य करणे या कार्यालयास उचित वाटत नाही.


000

उपरोक्त दोन वाहने वगळता सद्यस्थितीत जप्त असलेली एक काळ्या रंगाची जुनी वापरती बजाज कंपनीची पल्सर मो.सा.क्र.एमएच-०१-केए-२७८६ ही मोटर सायकल परत मिळण्यास कोणीही दावा केलेला नाही. तथापी, सदर धाडीत उपरोक्त जप्त केलेल्या तिनही वाहनांचा अवैध व्यवसायाकरीता उपयोग केला असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर मोटार सायकलच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास मोटार सायकलचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे मोटार सायकल त्याच्या मालकास परत करण्याचा अथवा मोटार सायकलचे मालक तेवढी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरची मोटार सायकल जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. 007

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १२९/२०१२, दिनांक ०२/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश

१) प्रस्तुत प्रकरणी, जप्त करण्यात आलेले प्रत्येकी २०० लिटर मापाचे पाच लोखंडी बॅरलमधील १००० लिटर व एक लोखंडी बॅरल मधील २५ लिटर असे मिळून एकुण १०२५ लिटर ऑईलचा साठा शासनजमा करण्यात यावा. सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

२) जप्त करण्यात आलेली एक काळ्या रंगाची जुनी वापरती बजाज कंपनीची पल्सर मोटर सायकल क्र.एमएच-०१-केए-२७८६ हे वाहन शासनजमा करण्यात येत आहे. सदर वाहनाच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनाचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्याच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनाच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा वाहनाचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनाची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहन लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

४). जप्त करण्यात आलेले २०० लिटर क्षमतेचे रिकामे होणारे एकुण ६ लोखंडी ड्रम इ. वस्तू शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) जलाल ऑईलवाला
२) अमित दिपक गोहील
३) मो. सलीम मेहबुब शेख
४) नुर
५) पल्सर मो.सा.क्र.एमएच-०१-केए-२७८६ चे मालक
६) ॲव्हेंजर मो.सा.क्र.एमएच-०३-बीएफ-४७९० चे मालक
७) मोटार कार क्र. एमएच-०४-ईडी-३२५३ चे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) निवड नस्ती.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES CONTROLLER OF ... HEAD OFFICE MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

D:\user E\Amaldata-2013\Ammal Aadesh\Aadesh.doc